# पोलीस भरती 2022 सराव प्रश्नसंच - 1

(एकूण प्रश्न : १००) (एकूण गुण : १००) (वेळ : १ तास ३० मिनिटे)

**1)** केवळ समारंभात वाजवल्या जाणा-या 'शहनाई' या वाद्याला स्वतंत्र वाद्य म्हणून कोणी ओळख मिळवून दिली?
अ) अली अकबर खाँ ब) उस्ताद बिस्मिलाँ खाँ
क) फैय्याज खान ड) पंडित शिवकुमार शर्मा

**2)** सुंदरलाल बहुगुणा यांनी सुरु केलेले 'चिपको आंदोलन' कशाशी संबंधित होते?
अ) पशुसंवर्धन ब) वृक्षसंवर्धन क) प्रदूषणमुक्ती ड) जलसंवर्धन

**3)** भारतातील पहिले कृषी निर्यात सुविधा केंद्र (एईएफसी) कोणत्या शहरात सुरु करण्यात आले?
अ) दिल्ली ब) पुणे क) मुंबई ड) अहमदाबाद

**4)** मुंबई विमानतळाला कोणते नवीन नाव काय देण्यात आले आहे?
अ) शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ
ब) बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय विमानतळ
क) यशवंतराव चव्हाण आंतरराष्ट्रीय विमानतळ
ड) दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ

**5)** भारतीय सेनादलातील (भूदल) ब्रिगेडिअर या पदापेक्षा लगतचे कनिष्ठ पद कोणते?
अ) कर्नल ब) लेफ्टनंट क) मेजर ड) कॅप्टन

**6)** अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आश्रमशाळा ही योजना सन... पासून सुरु करण्यात आली?
अ) 1956-57 ब) 1976-77 क) 1996-97 ड) 1999-2000

**7)** 'उस्मानाबाद' जिल्ह्याचे नवीन नाव काय ठेवायचा प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केला?
अ) शिवाजीनगर ब) अहिल्यानगर क) संभाजीनगर ड) धाराशिव

**8)** पॅलेस्टाईन देशातून इस्रायल देश कोणत्या वर्षी विभाजित झाला?
अ) 1948 ब) 1952 क) 1960 ड) 1945

**9)** 'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' - यासारख्या शब्दांनी समाजात अध्यात्माच्या मार्गाने ज्ञानदीप लावण्याचा ध्यास घेतलेल्या .... यांनी भाषा, प्रांत, धर्म, जातपात यापलीकडे जाऊन जीवनाचा विचार केला.
अ) नामदेव ब) मुकुंदराज क) मीराबाई ड) एकनाथ

**10)** तुकाराम महाराजांचे जन्मस्थळ कोणते?
अ) देहू ब) आळंदी क) पैठण ड) नेवासे

**11)** पुढीलपैकी उपसर्गघटित शब्द ओळखा.
अ) जनता ब) लाजाळू क) अधिपती ड) कावकाव

**12)** खालीलपैकी समाहार द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते?
अ) नास्तिक ब) नवरात्र क) मीठभाकर ड) पीतांबर

**13)** 'षडाष्टक येणे' - या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
अ) त्याग करणे ब) मार देणे क) दोघांचे न पटणे ड) दोष लावणे

**14)** 'पुढारी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.
अ) अनुनय ब) अनुयायी क) अनुभूती ड) प्रमुख

**15)** 'आमंत्रित' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.
अ) अनाहूत ब) निमंत्रित क) अनोळखी ड) यापैकी नाही

**16)** पुढील शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा – 'पक्षी'
अ) पंख ब) खग क) पर ड) पक्ष

**17)** 'अपरोक्ष' चा विरुद्ध शब्द.
अ) समोरासमोर ब) अपराजित क) परोक्ष ड) अदृश्य

**18)** 'गृह' हा कोणत्या प्रकारचा शब्द आहे?
अ) तद्भव ब) तत्सम क) फारसी ड) देशी

**19)** पुढीलपैकी कोणता तद्भव शब्द नाही?
अ) घर ब) पाय क) भाऊ ड) अस्थी

**20)** खालीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा.
अ) भवितव्य ब) आडनाव क) विज्ञान ड) गाडीवाला

Anand Pawar Academy

**21)** इव्हेंट मॅनेजमेंट टीममधील 9610 खुर्च्या चौरसाकृती मांडण्याचा प्रयत्न करतात. पण 6 खुर्च्या शिल्लक राहिल्याचे दिसते तर प्रत्येक रांगेत किती खुर्च्या असतील?

अ) 94 ब) 98 क) 89 ड) 86

**22)** एका कापड कारखान्यामध्ये 1240 कर्मचारी आहेत. ज्यापैकी 25 टक्के कर्मचा-यांची पदोन्नती झाली. तर पदोन्नती मिळविणा-या कर्मचा-यांची संख्या सांगा.

अ) 398 ब) 345 क) 310 ड) 372

**23)** $100 \div 25 \times \frac{1}{4}$=?

अ) $\frac{1}{25}$ ब) 24 क) 4 ड) 1

**24)** आकाश, भरत आणि कृष्णा यांच्याकडे 550 रुपयांचे कंत्राटी काम आहे. आकाश आणि भरत यांनी एकत्रितपणे कामाचा 7/11 वा भाग या प्रमाणात काम करण्याचे अपेक्षित आहे. तर कृष्णाला किती पैसे मिळतील?

अ) 310 ब) 220 क) 350 ड) 175

**25)** $\frac{-21}{43}$ चा गुणाकार व्यस्त सांगा.

अ) $\frac{43}{27}$ ब) $\frac{-43}{2}$ क) $\frac{21}{43}$ ड) $\frac{-43}{21}$

**26)** एका चौरसाची परिमिती जर 32 सेंमी असेल तर त्याच्या कर्णांची लांबी किती?

अ) 10 सेंमी ब) 12 सेंमी क) $8\sqrt{2}$ सेंमी ड) $12\sqrt{2}$ सेंमी

**27)** सरासरी काढा. : 96, 85, 35, 47, 45, 88

अ) 66 ब) 46 क) 70 ड) 60

**28)** 35 सेंमी त्रिज्या असलेल्या वर्तुळाची परिमिती किती?

अ) 220 सेंमी ब) 110 सेंमी क) 3850 सेंमी ड) 440 सेंमी

**29)** 13 : 52 : 78 ला सरळरुप द्या.

अ) 1 : 2 : 3 ब) 2 : 4 : 9 क) 1 : 3 : 8 ड) 1 : 4 : 6

**30)** एक रक्कम 3 वर्षांमध्ये चक्रवाढ व्याजाने दुप्पट होते. किती वर्षांमध्ये ती 8 पट होईल?

अ) 8 वर्षे ब) 9 वर्षे क) 10 वर्षे ड) 12 वर्षे

**31)** आयताकृती असलेल्या मोकळ्या जागेची एक बाजू 50 फुट व दुसरी बाजू 30 फुट आहे. त्या जागेला चारपदरी कुंपण लावायचे असल्यास एकूण किती लांबीची तार लागेल?

अ) 600 फुट ब) 150 फुट क) 640 फुट ड) 160 फुट

**32)** आयताकार क्षेत्राचे क्षेत्रफळ 836 चौसेंमी आहे. त्याची एक बाजू 22 सेंमी असेल तर मग त्याची परिमिती काय असेल?

अ) 200 सेंमी ब) 100 सेंमी क) 120 सेंमी ड) 400 सेंमी

**33)** जर एका संख्येच्या 25 टक्के 150 असतील तर त्या संख्येच्या 125 टक्के किती असतील?

अ) 750 ब) 800 क) 720 ड) 700

**34)** एक वस्तू 14 टक्के नफ्याने विकण्यात आली. जर 270 रु. जास्त लावून तीच वस्तू विकली असती तर 20 टक्के नफा झाला असता तर त्या वस्तूची खरेदी किंमत किती असेल?

अ) 3200 रु. ब) 3900 रु. क) 4800 रु. ड) 4500 रु.

**35)** एका आयताकार लोखंडी ठोकळ्याची लांबी 20 सेंमी, रुंदी 10 सेंमी आणि उंची 5 सेंमी असेल तर त्याला वितळून एक घनाकृती ठोकळा केला तर त्याचे घनफळ काय असेल?

अ) 100 ब) 35 क) 1000 ड) 10

**36)** A = B आणि B=O तर A=?

अ) O ब) अगणित क) मूळ संख्या ड) घन संख्या

**37)** जर 18x10=95, 6x16 =52, 14x8 = 61 तर 4x6 =?

अ) 24 ब) 23 क) 12 ड) 17

**38)** एक माणूस यात्रेला चालला असता, त्याला यात्रेहून परत येणारे पुरुष 9, त्यांच्या बायका आणि पुरुषांकडे एक मूल व बायकांच्या कडेवर व पाठीवर एक-एक मूल भेटले तर ते किती जण होते?

अ) 54 ब) 36 क) 45 ड) 63

**39)** रमेश, सुरेश, महेश, दिनेश हे चार भाऊ आहेत. रमेश सुरेशपेक्षा तीन वर्षांनी मोठा आहे. महेश सुरेशपेक्षा तीन वर्षांनी लहान आहे. दिनेश रमेशपेक्षा तीन वर्षांनी मोठा आहे. जर दिनेशचा जन्म 1960 चा असेल, तर महेशचा जन्म कोणत्या वर्षी झाला असेल?

अ) 1963 ब) 1966 क) 1969 ड) 1972

**40)** मालिका पूर्ण करा. : 38, 55, 82, 119, .....

अ) 112 ब) 166 क) 120 ड) 156

**41)** 11 ने निःशेष भाग जाणारी चार अंकी सर्वांत लहान समसंख्या व 13 ने निःशेष भाग जाणारी तीन अंकी सर्वांत मोठी समसंख्या यांची सरासरी किती?

अ) 2000 ब) 988 क) 1000 ड) 994.5

**42)** एक विशिष्ट काम करण्यास मधुकरला 45 दिवस लागतात. तर 18 दिवसांनंतर किती काम शिल्लक राहिलेले असेल?

अ) 3/5 ब) 2/5 क) 5/2 ड) यापैकी नाही

Anand Pawar Academy

**43)** ताशी 72 कि.मी. वेगाने चाललेल्या एका रेल्वेस एक खांब ओलांडायला 25 सेकंद लागले, तर त्या रेल्वेची लांबी किती?
अ) 1800 मी. ब) 500 मी. क) 800 मी. ड) 300 मी.

**44)** एक संख्या 10 टक्क्यांनी वाढविली व नंतर 10 टक्क्यांनी कमी केली, तर येणारी संख्या मूळच्या संख्येपेक्षा किती असेल?
अ) तेवढीच राहील ब) 10 टक्के कमी क) 1 टक्के वाढ ड) 1 टक्के कमी

**45)** सर्वांत मोठ्या ऋण पूर्णांकातून सर्वांत लहान दोन अंकी ऋण पूर्णांक वजा केल्यास उत्तर काय येईल?
अ) -100 ब) 99 क) -98 ड) 98

**46)** एका सांकेतिक भाषेत FHQA म्हणजे GIRL, तर RNES म्हणजे काय असेल?
अ) HJSM ब) TPGU क) SOFT ड) BOYS

**47)** एक टेबल 750 रुपयांना खरेदी केला. वाहतुकीसाठी 100 रुपये खर्च आला. तो टेबल 918 रुपयांना विकला, तर शेकडा नफा किंवा तोटा किती झाला?
अ) 8 टक्के नफा ब) 22.4 टक्के नफा
क) 18.3 टक्के नफा ड) 7.4 टक्के नफा

**48)** पुढीलपैकी विसंगत संख्या शोधा.
अ) 49 ब) 81 क) 60 ड) 16

**49)** 1800 च्या $\frac{5}{3}$ च्या $\frac{2}{5}$ च्या $\frac{1}{2}$ =?
अ) 600 ब) 60 क) 120 ड) 1800

**50)** किती किलोबाईट्स म्हणजे एक मेगाबाईट्स होय?
अ) 1024 ब) 10000 क) 1000 ड) 500

**51)** 'आम्ही' या सर्वनामाचा प्रकार सांगा.
अ) दर्शक सर्वनाम ब) संबंधी सर्वनाम
क) पुरुषवाचक सर्वनाम ड) प्रश्नार्थक सर्वनाम

**52)** शब्दाचा प्रकार ओळखा. : सौंदर्य
अ) भाववाचक नाम ब) सर्वनाम क) क्रियापद ड) क्रियाविशेषण

**53)** भाववाचक नाम ओळखा.
अ) उंची ब) शरद क) पुस्तक ड) झाड

**54)** प्रयोग ओळखा. : 'माझ्याच्याने जिना चढवतो.'
अ) कर्तरी प्रयोग ब) भावे प्रयोग
क) शक्य कर्मणी प्रयोग ड) कर्मणी प्रयोग

**55)** 'सन्मती' या शब्दाचा विग्रह शोधा.
अ) सत् + मती ब) सदा + मती क) सत्र् + मती ड) सन् + मती

**56)** वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा. : 'वैभव पुस्तक वाचत आहे.'
अ) अकर्तृक क्रियापद ब) संयुक्त क्रियापद
क) सकर्मक क्रियापद ड) अकर्मक क्रियापद

**57)** 'अनासक्ती' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?
अ) नासक्ती ब) आसक्ती क) सक्ती ड) सक्तीविना

**58)** आसपास - हे कोणत्या प्रकारचे क्रियाविशेषण आहे?
अ) संख्यावाचक ब) काळवाचक
क) परिणामवाचक ड) स्थळवाचक

**59)** 'आरती सुरु झाल्यानंतर घंटानाद सुरु झाला.' - या वाक्याचा प्रकार ओळखा.
अ) संयुक्त वाक्य ब) मिश्र वाक्य
क) विधानार्थी वाक्य ड) केवल वाक्य

**60)** 'ही वाईट कल्पना नाही.' - या वाक्याचे होकारार्थी वाक्य ओळखा.
अ) कल्पनेला बरे म्हटले पाहिजे. ब) कल्पना सदैव बरी असते.
क) कल्पना ही वाईट नाही. ड) ही कल्पना ब-यापैकी आहे.

**61)** खालीलपैकी अभ्यस्त शब्द ओळखा.
अ) करकर ब) कर क) अनुप्रास ड) करकोचा

**62)** 'चक्रपाणी' - या सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.
अ) मध्यमपदलोपी समास ब) समाहार द्वंद्व
क) अव्ययीभाव ड) बहुव्रिही

**63)** पुढील समास कोणत्या प्रकारचा आहे? - पुरणपोळी
अ) मध्यमपदलोपी समास ब) तत्पुरुष समास
क) अव्ययीभाव समास ड) द्वंद्व समास

**64)** 'महागाईस आळा घालावा.' - या वाक्याचे आज्ञार्थी वाक्य ओळखा.
अ) महागाईस आळा घालणे अशक्य. ब) महागाईस आळा घाला.
क) महागाईस आळा घालता येईल? ड) अबब! केवढी ही महागाई!

**65)** पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा. : 'त्यांना खूप कष्ट करावे लागतात.'
अ) कर्मणी ब) सकर्मक कर्तरी क) भावे ड) अकर्मक कर्तरी

**66)** 'हिरवीगार' - या शब्दाची जात ओळखा.
अ) नाम ब) विशेषण

Anand Pawar Academy

क) क्रियाविशेषण  ड) शब्दयोगी अव्यय

**67)** 'त्याने आपणहून गुन्हा कबूल केला.' - अधोरेखित शब्दाची जात ओळखा.
अ) पुरुषवाचक सर्वनाम  ब) द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम
क) आत्मवाचक सर्वनाम  ड) अनिश्चित सर्वनाम

**68)** खालील शब्दातून भाववाचक नाम शोधा.
अ) चतुराई  ब) गोदावरी  क) सोने  ड) राजे रजवाडे

**69)** खालीलपैकी विशेषनाम ओळखा.
अ) सरस्वती  ब) नवलाई  क) वाघ  ड) महासागर

**70)** संधी शोधा. - निः+विकार
अ) निर्विकार  ब) निःविकार  क) निर्वीकार  ड) निंविकार

**71)** जर दिलेल्या संख्येच्या 42 टक्के म्हणजे 12.6 असेल तर ती संख्या... आहे.
अ) 30  ब) 40  क) 35  ड) 45

**72)** 27 व 12 चे मध्यम पद कोणते?
अ) 24  ब) 12  क) 18  ड) 6

**73)** 20 मी. व 15 मी. कर्ण असलेल्या समभुजाचे क्षेत्रफळ काढा.
अ) 150 मी.$^2$  ब) 700 मी.$^2$  क) 300 मी.$^2$  ड) 30 मी.$^2$

**74)** -16 मिळविण्यासाठी 43 मधून किती वजा करायला हवेत?
अ) -27  ब) 27  क) 59  ड) -59

**75)** एका वस्तूची लिखित किमत 1260 रु. आहे आणि ती जर 5 टक्के सवलतीत विकली तर तिची विक्री किमत काय असेल?
अ) 1100 रु.  ब) 1089 रु.  क) 1164 रु.  ड) 1197 रु.

**76)** आशीष आणि बबलू यांच्या वयाचे गुणोत्तर 3:5 आहे. त्यांच्या वयांची बेरीज 56 वर्षे असल्यास बबलूचे आज वय किती?
अ) 21  ब) 40  क) 35  ड) 28

**77)** एक मीटर जाळीचा 4/5 भाग 12 रुपयांना असेल तर त्याच जाळीच्या एक मीटरच्या 3/5 भागाची काय किमत होईल?
अ) 9 रु.  ब) 18 रु.  क) 15 रु.  ड) 16 रु.

**78)** सहा मुलांच्या वयांची सरासरी 8 आहे. पहिल्या 2 च्या वयांची सरासरी 7.5 आहे, तर राहिलेल्या चौघांच्या वयांची सरासरी किती असेल?
अ) 6.25  ब) 8.25  क) 5.25  ड) 4.25

**79)** आज पाऊस पडेल याची संभाव्यता 0.55 आहे, तर मग आज पाऊस न पडण्याची संभाव्यता काय असेल?
अ) 1/2  ब) 1/20  क) 9/20  ड) 11/20

**80)** 108, 288, 360 यांचा मसावि काढा.
अ) 12  ब) 18  क) 19  ड) 36

**81)** एका विध्यार्थ्याने एका संख्येस 3 ने गुणण्याऐवजी 3 ने भागले. त्याचे उत्तर 3 आले, तर बरोबर उत्तर किती यावयास पाहिजे होते?
अ) 9  ब) 81  क) 27  ड) यापैकी नाही

**82)** महेशचा रांगेत 23 वा क्रमांक असून त्याच्या अलीकडे प्रमोद व पलीकडे राहुल उभे आहेत. प्रमोद रांगेत मध्यभागी आहे, तर रांगेत एकूण किती मुले आहेत?
अ) 42  ब) 44  क) 45  ड) 43

**83)** 1 हेक्टरमध्ये 1 बाय 1 मीटर अंतरावर किती आंब्याची झाडे लावली जातील?
अ) 10000  ब) 20000  क) 1000  ड) 4800

**84)** खालीलपैकी विसंगत घटक ओळखा.
अ) पृथ्वी  ब) शनि  क) मंगळ  ड) सूर्य

**85)** एका शाळेमध्ये जेवढे विद्यार्थी तेवढीच प्रति विद्यार्थी वर्गणी गोळा केली. जर ती वर्गणी 6551 रुपये असेल तर विद्यार्थ्यांची संख्या किती असेल?
अ) 81  ब) 79  क) 71  ड) 83

**86)** सहसंबंध ओळखून गटामध्ये बसणारी संख्या शोधा. : 898, 787, 676, ?
अ) 879  ब) 565  क) 545  ड) 555

**87)** 1.213 + 0.56 + 0.038 + 0.0042 =?
अ) 1.349  ब) 1.8152  क) 0.1349  ड) 2.573

**88)** एका चौरसाकृती शेताची बाजू 100 मीटर असेल तर त्या शेताचे क्षेत्रफळ किती होईल?
अ) 400 मी.$^2$  ब) एक एकर  क) 10000 मी.$^2$  ड) 1000 मी.$^2$

**89)** एका कुटुंबात चार व्यक्तीचे सरासरी वय 40 वर्षे आहे. त्यातील एका मुलाचे लग्न झाले. त्यामुळे कुटुंबातील व्यक्तींच्या वयाची सरासरी 36 झाली, तर सुनेचे वय किती?
अ) 20  ब) 32  क) 24  ड) 36

**90)** एका दुकानदाराने गि~हाईकास छापील किमतीवर शेकडा 5 सूट

Anand Pawar Academy

दिल्याने दुकानदारास 1425 रुपये मिळाले. तर त्या वस्तूची छापील किमत किती आहे?

अ) 1430  ब) 1526.25  क) 1350  ड) 1500

**91)** महाराष्ट्रातील 'औरंगाबाद' जिल्ह्याचे नवीन नाव काय ठेवायचा राज्य मंत्रिमंडळाने प्रस्ताव मंजूर केला?

अ) शिवाजीनगर  ब) अहिल्यानगर  क) संभाजीनगर  ड) जिजाऊनगर

**92)** खालीलपैकी कोणते दोन देश 'राष्ट्रमंडळ' समूहामध्ये सामील झाले आहेत?

अ) चाड आणि कोमोरोस  ब) बेनीन आणि बुरुंडी

क) गैबोन आणि टोगो  ड) यापैकी नाही

**93)** एक अश्वशक्ती = ?

अ) 746 वॅट  ब) 476 वॅट  क) 1000 वॅट  ड) 27.6 वॅट

**94)** भारतातील समुद्रसपाटीपासूनची उंची कोणत्या शहराजवळील समुद्रसपाटीपासून ठरविली जाते?

अ) मुंबई  ब) चेन्नई  क) कन्याकुमारी  ड) कोचीन

**95)** तांबडा समुद्र व भूमध्य सागर कोणत्या कालव्याने जोडला गेला आहे?

अ) सुएझ  ब) पनामा  क) इंदिरा गांधी  ड) वरीलपैकी नाही

**96)** खालीलपैकी कोणती नदी अरबी समुद्राला मिळते?

अ) तापी  ब) कावेरी  क) महानदी  ड) कृष्णा

**97)** रोहिल (खंडेला) कोणत्या राज्यात आहे, जिथे युरेनियमचे भांडार सापडले?

अ) पंजाब  ब) गुजरात  क) महाराष्ट्र  ड) राजस्थान

**98)** खालीलपैकी कोणते खरीप पीक नाही?

अ) कापूस  ब) सोयाबीन  क) गहू  ड) तूर

**99)** खालीलपैकी कोणता रंग प्राथमिक रंग नाही?

अ) काळा  ब) निळा  क) लाल  ड) हिरवा

**100)** 'कामाख्या' मंदिर कोणत्या राज्यात आहे जिथे 'अम्बुबाची' मेला आयोजित होतो?

अ) आसाम  ब) महाराष्ट्र  क) गुजरात  ड) कर्नाटक

## पोलीस भरती 2022 सराव प्रश्नसंच - 1

Click To Join Telegram

### उत्तरपत्रिका

| प्रश्न.क्र. | पर्याय | प्रश्न. क्र. | पर्याय | प्रश्न.क्र. | पर्याय | प्रश्न.क्र. | पर्याय | प्रश्न.क्र. | पर्याय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ब | 21 | ब | 41 | क | 61 | अ | 81 | क |
| 2 | ब | 22 | क | 42 | अ | 62 | ड | 82 | ड |
| 3 | ब | 23 | ड | 43 | ब | 63 | अ | 83 | अ |
| 4 | ड | 24 | ब | 44 | ड | 64 | ब | 84 | ड |
| 5 | अ | 25 | क | 45 | ड | 65 | ड | 85 | अ |
| 6 | क | 26 | क | 46 | क | 66 | ब | 86 | ब |
| 7 | ड | 27 | अ | 47 | अ | 67 | क | 87 | ब |
| 8 | अ | 28 | अ | 48 | क | 68 | अ | 88 | क |
| 9 | अ | 29 | ड | 49 | अ | 69 | अ | 89 | अ |
| 10 | अ | 30 | ब | 50 | अ | 70 | अ | 90 | ड |
| 11 | क | 31 | क | 51 | क | 71 | अ | 91 | क |
| 12 | क | 32 | क | 52 | अ | 72 | क | 92 | क |
| 13 | क | 33 | अ | 53 | अ | 73 | अ | 93 | अ |
| 14 | ब | 34 | ड | 54 | क | 74 | क | 94 | ब |
| 15 | अ | 35 | क | 55 | अ | 75 | ड | 95 | अ |
| 16 | ब | 36 | अ | 56 | ब | 76 | क | 96 | अ |
| 17 | क | 37 | ड | 57 | ब | 77 | अ | 97 | ड |
| 18 | ब | 38 | क | 58 | ड | 78 | ब | 98 | क |
| 19 | ड | 39 | क | 59 | ड | 79 | क | 99 | अ |
| 20 | ड | 40 | ब | 60 | ड | 80 | ड | 100 | अ |